RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

# कराड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील शालेय पोषण आहार योजनेतील समस्या आणि उपाय

**श्री. आनंद गणपत पळसे**
विस्तार अधिकार,
पंचायत समिती,कराड जि. सातारा

**डॉ. सुधीर कुंभार,**
क.भा.पाटील विघालय व ज्यु. कॉलेज,
ढेबेवाडी ता. पाटण जि. सातारा

'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 हा अधिनियम जम्मू काश्मिर वगळता उर्वरित भारतभर 1 एप्रिल 2010 पासून अंमलात आला. या अधिनियमान्वये 6 ते 14 वयोगटातील बालकांचा शारीरिक, बौध्दीक, भावनिक विकासासाठी विविध तरतुदींचा समावेश आर टी ई 2009 मध्ये अनेक नियम व अटी, कलमे नमूद करण्यात आली आहेत. बालकाला शिक्षणाचा हक्क आहे त्या शिक्षण प्रकियेत त्यालाही काही हक्क आहेत. त्यास सर्व प्रकाराच्या सुविधा देणे स्थानिक प्राधिकरणास बंधनकारक आहे.

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याच्या दृष्टीने तसेच प्राथमिक शाळांमधील विदयार्थ्यांची पटनोंदणी व उपस्थितीचे प्रमाण वाढवण्यासाठी आणि शाळेतील विदयार्थ्यांची गळती थांबविण्याकरिता दिनांक 22नोंव्हेंबर 1995 पासुन केंद्र पुरस्कृत शालेय पोषण आहार योजना सुरु करणेत आली आहे. केंद्र व राज्य शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी संस्थाच्या अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांमधील इ. 1 ली ते 8 वी पर्यंतचे शिक्षण घेणारे विदयार्थी शालेय पोषण आहार योजनेचे लाभार्थी आहेत. केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार या योजनेंतर्गत इ. 1 ली ते 5 वी पर्यंतच्या विदयार्थ्यांना 450 उष्मांक आणि 12 ग्रॅम प्रथिने युक्त दुपारचे जेवण विदयार्थ्यांना देणेत येते. तसेच इ. 6 वी ते 8 वी पर्यंतच्या विदयार्थ्यांना 700 उष्मांक आणि 20 ग्रॅम प्रथिने युक्त दुपारचे जेवण विदयार्थ्यांना देणेत येत आहे.

शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी संबंधीत शाळांच्या शाळा व्यवस्थापन समितीवर जबाबदारी सोपवण्यात आलेली आहे. तथापि या योजनेची अंमलबजावणी व्यवस्थीत होत नाही, ब—याच ठिकाणी विदयार्थ्यांना आहार शिजवून दिला जात नाही किंवा कमी आहाराचे वाटप करण्यात येते. अशा स्वरुपाच्या तक्रारी होत असतात तसेच शालेय पोषण आहारापासुन विदयार्थ्यांना विषबाधाही झाल्याच्या घटनाही घडलेल्या आहेत. यासाठी सदर योजनेची अंमलबजावणी व्यवस्थितपणे होते किंवा कसे याचा अभ्यास करणे गरजेचे वाटते यासाठी कराड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शालेय पोषण आहारा योजनेतून समस्या शोधून त्यावर उपाय योजने गरजेचे वाटते.

आर टी ई 2009 नुसार बालकाच्या सर्वांगिण विकासासाठी दर्जेदार आहार मिळण्याचा हक्क बालकाला मिळालाच पाहिजे यासाठी प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था, समाजसेवी संस्था, अध्यापक, मुख्याध्यापक तसेच शाळा व्यवस्थापन समितींने एकत्रीत प्रयत्न करणे आवश्यक आहे. या सुविधा शासनस्तरावर देण्यासाठी आणि एन सी एफ 2005 मधील अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न व्हावेत.

## प्रस्तावना

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याच्या दृष्टीने तसेच प्राथमिक शाळांमधील विदयार्थ्यांची पटनोंदणी व उपस्थितीचे प्रमाण वाढवण्यासाठी आणि शाळेतील विदयार्थ्यांची गळती थांबविण्याकरिता दिनांक 22नोंव्हेंबर 1995 पासुन केंद्र पुरस्कृत शालेय पोषण आहार योजना सुरु करणेत आली आहे. केंद्र व राज्य शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी संस्थाच्या अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांमधील इ. 1 ली ते 8 वी पर्यंतचे शिक्षण घेणारे विदयार्थी शालेय पोषण आहार योजनेचे लाभार्थी आहेत. केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार या योजनेंतर्गत इ. 1 ली ते 5 वी पर्यंतच्या विदयार्थ्यांना

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

450 उष्मांक आणि 12 ग्रॅम प्रथिने युक्त दुपारचे जेवण विदयार्थ्यांना देणेत येते. तसेच इ. 6 वी ते 8 वी पर्यंतच्या विदयार्थ्यांना 700 उष्मांक आणि 20 ग्रॅम प्रथिने युक्त दुपारचे जेवण विदयार्थ्यांना देणेत येत आहे.

शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी संबंधीत शाळांच्या शाळा व्यवस्थापन समितीवर जबाबदारी सोपवण्यात आलेली आहे. तथापि या योजनेची अंमलबजावणी व्यवस्थीत होत नाही, ब–याच ठिकाणी विदयार्थ्यांना आहार शिजवून दिला जात नाही किंवा कमी आहाराचे वाटप करण्यात येते. अशा स्वरुपाच्या तक्रारी होत असतात तसेच शालेय पोषण आहारापासुन विदयार्थ्यांना विषबाधाही झाल्याच्या घटनाही घडलेल्या आहेत. यासाठी सदर योजनेची अंमलबजावणी व्यवस्थितपणे होते किंवा कसे याचा अभ्यास करणे गरजेचे वाटते यासाठी कराड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शालेय पोषण आहारा योजनेतून समस्या शोधून त्यावर उपाय योजने गरजेचे वाटते.

## उद्दिष्टये

1. प्राथमिक शाळांमधील शालेय पोषण आहार योजनेच्या विहीत कार्यवाहीचा शोध घेणे.
2. शालेय पोषण आहार योजनेतील शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका शोधणे.
3. शालेय पोषण आहार योजनेतील समस्या शोधणे.
4. शिक्षक, मुख्याध्यापक व व्यवस्थापनाला शालेय पोषण आहार देताना येणा–या अडचणीवर उपाय सूचविणे.

## व्याप्ती व मर्यादा

कराड तालुक्यातील जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या 309 शाळांपैकी व 24 केंद्रा पैकी सुपने बीटातील 3 केंद्रातील 43 शाळांपुरते मर्यादित.

## गृहितक

सर्व शाळांना शालेय पोषण आहारा योजनेच्या कार्यवाहीत अडचणी आहेत. त्यावर उपाय योजनांसाठी शिक्षक व व्यवस्थापनाने एकत्र प्रयत्न केल्यास त्या सुविधा उत्कृष्ट पध्दतीने कार्यरत राहतील.

## कार्यपध्दती

सुपने बीटातील 3 केंद्रामधील 43 प्राथमिक शाळांच्या शालेय पोषण आहारा योजनेच्या कार्यवाहीची पाहणी करणे त्यातील समस्या, अडचणी शोधणे तसेच शिक्षक, मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समितीच्या मुलाखती घेणे. योजनेतील अडचणी जाणून घेवून त्यावर उपाय योजना सुचविणे.

## माहितीचे संकलन व पथक्करण

शालेय पोषण आहारा योजनेसाठी पात्र असणा–या शाळा

जिल्हा परिषद शाळा – 309

नगर परिषद शाळा – 10

खाजगी प्राथमिक व माध्यमिक अनुदानित –111

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

कराड तालुक्यातील सुपने बीटातील 43 पैकी 43 शाळांमध्ये शालेय पोषण आहार योजना उपलब्ध आहे असे दिसून येते. अशा स्वरुपाचे प्रतिज्ञापत्र संबंधीत शाळांनी दिलेले आहे.

**शालेय पोषण आहार योजना कार्यवाहीबाबत माहिती**

| कार्यवाहीचे स्वरुप | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| शा.पो.आ. योजनेची कार्यवाही करणा—या शाळा | 43 | 100 |
| तांदुळ व धान्यादी माल नियमित पुरवठा होत असलेल्या शाळा | 43 | 100 |
| स्वयंपाकी व मदतनीस कार्यरत असणा—या शाळा | 43 | 100 |
| किचनशेड उपलब्ध असणा—या शाळा | 41 | 95 |
| पिण्याचे पाणी उपलब्ध असणा—या शाळा | 43 | 100 |

**शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका**

| स्वरुप | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| शा.पो.आ. सनियंत्रण समिती गठीत करणा—या शाळा | 43 | 100 |
| बचत गटाचा प्रत्यक्ष सहभाग असणा—या शाळा | 43 | 100 |
| चव नोंदवहीत पालकांच्या नोंदी घेणा—या शाळा | 40 | 93 |
| आहाराच्या दर्जाबाबत दक्षता घेणा—या शाळा | 40 | 93 |
| पूरक आहार नियमित देणा—या शाळा | 39 | 90 |
| वैदयकीय तपासणी नियमित पणे करणा—या शाळा | 43 | 100 |

**शालेय पोषण आहार योजनेतील समस्या व अडचणी**

| समस्या व अडचणी | शाळा संख्या | | |
|---|---|---|---|
| | होय (%) | नाही (%) | काहीप्रमाणात (%) |
| शा.पो.आ.अनुदान वेळेत प्राप्त होते काय? | 0 (0) | 43(100) | 0(0) |
| पूरक आहार नियमित दिला जातो काय ? | 23(54) | 20(46) | 0(0) |
| इंधन म्हणून गॅसचा वापर होतो काय ? | 28(65) | 15(35) | 0(0) |
| आहारामध्ये भाजीपाल्याचा वापर पूरेसा केला जातो काय ? | 3(07) | 0(0) | 40(93) |
| पोषण आहार निकषा प्रमाणे शिजवून दिला जातो काय ? | 23(54) | 20(46) | 0(0) |
| जेवणापूर्वी हाताची स्वच्छता केली जाते काय ? | 40(93) | 3(07) | 0(0) |
| मायक्रोन्युट्रीशन सिरप, प्रोटीन पावडरचा वापर होतो काय ? | 0(0) | 0(0) | 43(100) |
| स्वच्छता विषयक साहित्य,साबण नियमित प्राप्त होते काय ? | 0(0) | 0(0) | 43(100) |

**निष्कर्ष**

1. कराड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमये शालेय पोषण आहार योजनेच्या कार्यवाहीची अंमलबजावणी करताना भिन्नता आढळून येते.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

2. शालेय पोषण आहाराच्या दर्जाबाबत 95 टक्के शाळां दक्षता घेतात. दर्जाबाबत दैनंदिन चव रजिस्टरमध्ये पालकांचा सहभाग औपचारिक नोंदविला जातो.
3. शालेय पोषण आहार अनुदान नियमित दरमहा वेळेत प्राप्त होत नसल्याने मुख्याध्यापकांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागते.
4. शालेय पोषण आहार 46 टक्के शाळांमध्ये निकषाप्रमाणे शिजवून दिला जात नाही.
5. आठवडयातून एकदा दिला जाणारा पूरक आहार 46 टक्के शाळांमध्ये नियमितपणे दिला जात नाही.
6. पोषण आहारामध्ये भाजीपाला व इतर पोषक घटकांचा वापर 93 टक्के शाळांमध्ये काहीप्रमाणात केला जातो.
7. विदयार्थ्यांना मायक्रोन्युट्रीशन सिरप, प्रोटीन पावडर नियमितपणे दिले जात नाही.
8. स्वच्छता विषयक साहित्य,साबण नियमितपणे प्राप्त होत नसल्याने त्यांचा वापर काहीप्रमाणातच केला जातो.

## उपाय व शिफारशी

1. शासनाकडून पोषण आहाराच्या खर्चाची तरतूद म्हणून अग्रीम (आगाऊ) स्वरुपाची रक्कम आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस मिळावी. जेणे करुन दरमहाचा खर्च सदर रक्कमेतून शाळांना करणे सोयीचे होईल.
2. पूरक आहाराची कार्यवाही करताना लोकसहभाग म्हणून गावातील प्रतिष्ठित, दानशूर व्यक्ती व युवा मंडळे यांचा प्रत्यक्ष सहभाग असावा.
3. लोहसहभागातून गॅस कनेक्शन घेणेसाठी शाळा व्यवस्थापन समितीने पुढाकार घ्यावा.
4. स्वयंपाकी व मदतनीसांना पोषण आहाराच्या स्वच्छतेबाबत तसेच दर्जाबाबत प्रशिक्षण देण्यात यावे.
5. शालेय परिसरामध्ये परसबागा विकसित करुन त्यामध्ये भाजीपाला घेणेत यावा व त्याचा वापर पोषण आहारामध्ये केला जावा.

## संदर्भ

1. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009, महाराष्ट्र राज्य संशोधन व प्रशिक्षण परिषद (विदया परिषद), पुणे–30, नोंव्हेंबर 2011
2. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 शैक्षणिक आव्हानाकडून कृती कार्यालयाकडे संपादक, म.रा.शै.सं. व प्रशिक्षण परिषद पुणे–30, मे 2002
3. शालेय पोषण आहार योजना, शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय, मुंबई'–32, जून 2009